# दैनिक राजधर्म

- उस्मानाबाद
- वर्ष ४
- अंक १५३
- ₹ १
- शनिवार, दि.२५ जुलै २०२०
- पृष्ठे : ६
- RNI: MAHMAR/2017/71292


## पालघरमध्ये ३.१ तीव्रतेच्या भूकंपाचे धक्के

**मुंबई,प्रतिनिधी**:मागील अनेक दिवसांपासून पालघरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. गुरुवारी रात्री १२ वाजून २६ मिनिटाला भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ३.१ इतकी मोजली गेली. अर्ध्या रात्री भूकंपाचे धक्के जाणवताच लोक आपल्या घरातून बाहेर पडले होते. या भूकंपामुळे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीने सांगितले. यासह जम्मू-काश्मीर आणि उत्तर प्रदेशातही भूकंपाचे धक्के बसले आहेत. उत्तर प्रदेशच्या अलिगडमध्ये सकाळी ६ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले होते. प्रशासनाने लोकांना जागरुक राहण्यास आणि अफवांवर विश्वास न ठेवण्यास सांगितले आहे. पालघरमध्ये मागील एका वर्षात पाचव्यांदा भूकंप आला.



## वागदरी येथे जनावरांना लसीकरण

**वागदरी,(प्रतिनिधी)**:मानवी आरोग्य बरोबरच आपल्या पशूधनाच्या आरोग्यची काळजी घेतली पाहिजे या उदात्त हेतूने शासनाकडून पशूवैद्देकीय सेवा देण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून मौजे वागदरी ता.तुळजापूर येथे जनावरांना लसीकरण करण्यात आले. पावसाळ्यात जनावरांना शक्यतो घटसर्प, फऱ्या वगेरे अजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो. तो होऊनये म्हणून नळदुर्ग येथील पशुधन वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.एल.भातलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वागदरी येथे जनावरांना मोफत लसीकरण करण्यात आले.

## शिवसेना मित्र परिवाराच्या वतीने पाण्याच्या हावदाचे लोकार्पण

**तुळजापूर,प्रतिनिधी**: शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे तसेच उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्तदिनांक १७ते२७ जुलै या कालावधीत होणाऱ्या शिवसप्ताहाच्या आठव्या दिवशी वडगाव(लाख) येथे मुक्या प्राण्याला पिण्याच्या पाण्याचे हौदाचे लोकार्पण करण्यात आले.यावेळी दामोदर गाढवे, चेतन बंडगर,शाम माळी,रोहित नागनाथराव चव्हाण,शंकर गव्हाणे,बालाजी पांचाळ,सिदफळ सोशल मिडीया विभागप्रमुख सिद्राम कारभारी,लखन गायकवाड,सचिन सोनवणे,पवन जगताप, कल्याण जगताप. उपस्थित होते.

## मोईन इब्राहीम शेख यांची नियुक्ती

**नळदुर्ग,प्रतिनिधी**: राजीव गांधी ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या जिल्हाध्यक्षपदी नळदुर्ग येथील



मोईन इब्राहीम शेख यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान त्यांच्या या निवडीचे शहरात स्वागत करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षापासून काँग्रेस पार्टीचे विचार व आचार जनते पर्यंत पोहंचविण्याचे चांगले काम मोईन शेख यांच्या कडून झाले आहे, त्यामुळे राजीव गांधी ऑल इंडिया काँग्रेस वर्कींग कमेटीच्या जिल्हाध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे जिल्हयात काँग्रेस पार्टीचे कार्य वाढण्यास मदत होईल या दृष्टीने ही निवड करण्यात आली आहे. आपल्याला या दिलेल्या पदामुळे काँग्रेस कमेटीचे आचार व विचार हे जन सामान्यापर्यंत पोहंचविण्याचे चांगले कार्य मोईन शेख यांच्याकडून होणार आहे म्हणून राजीव गांधी ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचे प्रदेश अध्यक्ष रविंद्र सहारा यांनी या निवडीचे पत्र मोइन शेख यांना दिले आहे. मोईन शेख यांच्या या निवडीमुळे त्यांच्या समर्थकांनी शहरात फटाके फोडून स्वागत केले आहे.

## वरिष्ठांना व्हॉटसअॅप ग्रुपवर शिवीगाळ

**मुंबई,प्रतिनिधी**:मुंबई पोलीस दलातील एका पोलीस निरीक्षकाला व्हॉटसअॅप ग्रुप वर वरिष्ठांना शिवीगाळ आणि अवमानकारक मेसेज लिहिणं चांगलंच महागात पडलं आहे. स्वत: विरुद्ध झालेल्या कारवाईचा राग व्हॉटसअॅप ग्रुप वर आपल्या वरिष्ठांना आक्षेपार्ह भाषेचा वापर करून व्यक्त केला. ज्यामुळे या पोलीस निरीक्षकाला सेवेतून निलंबित करण्यात आलं आहे. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी दक्षिण मुंबईतील ब्रीच कॅंडी या परिसरात असलेल्या डर्टी बन पबमध्ये भांडण सुरू असल्याचा पोलिसांना कॉल आला. त्यावेळेस अनुप डांगे हे रात्रपाळीला होते. डांगे आपल्या पथकासोबत पबमध्ये पोहोचले आणि यासंदर्भात गुन्ह्याची नोंद केली. मात्र या गुन्ह्याची नोंद करताना डांगे यांनी त्या भांडणाचे वेळी उपस्थित नसलेल्या एका व्यक्तीचे नाव या गुन्ह्यात नोंदवण्याचे आदेश दिले. हा प्रकार समोर आल्यानंतर डांगे यांना दक्षिण प्रादेशिक विभागातील कंट्रोल रूममध्ये संलग्न करण्यात आले. डांगे या बदलीमुळे संतापले होते आणि वरिष्ठांचा राग मनात ठेवून होते.गावदेवी पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांचा एक व्हॉटसअॅप ग्रुप आहे. या ग्रुपचं नाव 'गावदेवी ऑफिसर्स' असं आहे. या ग्रुपमध्ये डांगे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध आक्षेपार्ह, अवमानकारक आणि चारित्र्याबाबत भाष्य करणारा मेसेज पाठवला. हा मेसेज व्हॉटसअॅप ग्रुपच्या बाहेर पोहोचला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना पर्यंत ही बाब पोहोचली.या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डांगे यांना सेवेतून निलंबित केलं. शिस्तप्रिय दल असणारा असा मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल असं वक्तव्य करणं हे चुकीचं असून त्यामुळंच ही कारवाई करण्यात आल्याचं कळत आहे. तसेच यापुढे असा प्रकार पुन्हा होऊ नये याची सुद्धा दक्षता घेण्यात येत आहे.

# कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध योजना बाबत सर्व सदस्यांशी सविस्तर चर्चा



**तुळजापूर,प्रतिनिधी**: नगरपरिषद कार्यालय तुळजापूर येथील दिनांक २३ जुलै रोजी प्रांगणामध्ये जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार उपविभागीय अधिकारी रामेश्वर रोडगे, तहसीलदार सौदागर तांदळे, उपविभागीय पोलिस अधिकारी दिलीप टिप्परसे यांनी सर्व नगरसेवकांची बैठक घेऊन त्यामध्ये कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध योजना बाबत सर्व सदस्यांशी सविस्तर चर्चा करून कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजना बाबत सर्व सदस्यांना अवगत केले व आगामी काळात घेण्यात येणारे विविध प्रकारचे सर्वेक्षण थर्मल स्केनिंग, ओक्सीमीटर आणि रेपीड ऐटोजन टेस्ट व इतर प्रकारचे सर्वेक्षणाची कामे सदस्य त्यांच्या प्रभागातील कार्यकर्त्यांच्या मदतीने तसेच नगरपरिषद कर्मचारी, तहसील कार्यालयातील कर्मचारी व शिक्षक यांच्या मदतीने पूर्ण करण्यास सुचना दिल्या, प्रसंगी नगराध्यक्ष सचिन रोचकरी यांनी नगरपरिषदेचे वतीने कोरोना संदर्भातील केलेल्या कार्यवाही बाबत माहिती दिली. तसेच सदस्यांच्या वतीने येणाऱ्या विविध अडचणी उपविभागीय अधिकारी रोडगे यांच्यासमोर मांडल्या त्यावर त्यांनी कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार यांना दिले.सभेसाठी सर्व सदस्य, कार्यालय अधिक्षक पाठकसाहेब, स्वच्छाता निरीक्षक शेख आदि उपस्थित होते.

## मोठ्या प्रमाणावर तपासण्या करून मृत्यू दर शून्यावर आणणे हे एकमेव उद्दिष्टःउद्धव ठाकरे

**मुंबई,(प्रतिनिधी)**:कोरोना रुग्णांवर सर्व जिल्ह्यांमधून योग्य वैद्यकीय उपचार व्हावेत जेणेकरून रुग्ण बरे होण्याचे प्रमाण वाढेल तसेच मृत्यू दरदेखील झपाट्याने कमी होऊ शकेल असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागात सुविधा मर्यादित आहेत त्यामुळे त्या झपाट्याने वाढवणे आणि कोणत्याही परिस्थितीत गाफील न राहता मोठ्या प्रमाणावर तपासण्या करून मृत्यू दर शून्यावर आणणे हे एकमेव उद्दिष्ट आहे. यादृष्टीने विविध जिल्ह्यांमधील टास्क फोर्सच्या डॉक्टर्सनी मुंबईच्या राज्य टास्क फोर्सच्या डॉक्टरांशी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला व चर्चा केली, याप्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बोलत होते.मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार सर्व जिल्ह्यांत टास्क फोर्स स्थापन करण्यात आले आहेत.मुख्यमंत्री म्हणाले, मृत्यू दर कमी नाही तर शून्यावर आणणे हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे, त्यादृष्टीने नेमके कशा रीतीने



उपचार देण्यात येत आहेत तसेच त्या उपचारांमध्ये सर्व जिल्ह्यांत एकसूत्रीपणा आणि समानता असणे आवश्यक आहे आणि म्हणूनच जिल्ह्यांतील टास्क फोर्स आणि मुंबईतील टास्क फोर्सची एकत्रित बैठक आपण आयोजित केली आहे. मुंबईत टास्क फोर्सने चांगले काम केले आहे. सुरुवातीला औषधे नव्हती, आता काही विशेष औषधे उपलब्ध झाली आहेत. पण त्यामुळे सर्वत्र या औषधांच्या उपयोगासाठी मार्गदर्शक तत्वे आवश्यक आहेत. धारावी आणि वरळीत प्रादुर्भाव झाला होता त्यावेळेस तर ही औषधेही नव्हती तरी आपण या भागांत साथीला नियंत्रणात ठेवले असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, रुग्णांचे मानसिक स्वास्थ्य खच्ची होऊन न देणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.डॉ तात्याराव लहाने यांनी या बैठकीचे सूत्रसंचालन केले.

## राज्यातील १२१ मदरशांसाठी १ कोटी ८० लाख रुपयांचा निधी

**मुंबई,प्रतिनिधी**:राज्यातील १२१ मदरशांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी १ कोटी ८० लाख रुपयांचा निधी वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली. हा निधी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत देण्यात येणार आहे, असे मलिक यांनी सांगितले.मदरशांमधील विद्यार्थ्यांना क्रमिक अभ्यासक्रमातील गणित, विज्ञान, सम ाजशास्त्र, भाषा इत्यादी विषयांचे शिक्षण देण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येते. मुख्य प्रवाहात आणण्यास या योजनेतून प्रोत्साहन देण्यात येते.या योजनेमधून ठाणे जिल्ह्यातील १३ मदरशांसाठी १८ लाख रुपये, वाशिम जिल्ह्यातील १२ मदरशांसाठी २१ लाख रुपये, बुलडाणा जिल्ह्यातील २ मदरशांसाठी १ लाख ४० हजार रुपये, औरंगाबाद जिल्ह्यातील ८० मदरशांसाठी १ कोटी १६ लाख ४० हजार रुपये, जालना जिल्ह्यातील ७ मदरशांसाठी १३ लाख ८० हजार रुपये, परभणी जिल्ह्यातील ३ मदरशांसाठी ४ लाख ८० हजार रुपये, हिंगोली जिल्ह्यातील एका मदरशासाठी १ लाख २० हजार रुपये तर वर्धा जिल्ह्यातील ३ मदरशांसाठी ४ लाख रुपये असे एकूण १ कोटी ८० लाख ६० हजार रुपये अनुदान मानधनासाठी वितरित करण्यात येणार आहे.

## आयआरबीच्या निष्काळजीपणामुळे हायवेवर अपघातात वाढ

### टोल वसुली सक्तीने मात्र सुविधांचा अभाव, अपूर्ण कामामुळे वाहन चालकांना त्रास

**तुळजापूर,(प्रतिनिधी)**:

तुळजापूर सोलापूर वाहतूक नॅशनल हायवे झाल्यामुळे खूप सुरळीत झाली खूप सोयीस्कर झाली आहे असं वाटत असलं तरी या हायवेवर अपघाताचे प्रमाण चांगलेच वाढलेले दिसत आहे.अपघाताचे प्रमाण एवढे वाढले आहे की हायवेवर प्रवास करताना वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण वाढले आहे आयआरबी या कंपनीकडून मोठ्याप्रमाणात टोल वसूली केली जाते पण त्या मानाने या रस्त्यावर कुठल्याही सुविधा उपलब्ध करून देत नाहीत रस्त्यात जागोजागी काम अपूर्ण राहिल्याचे चित्र दिसते सर्विस रस्त्याकडे आयआरबीचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. अनेक सर्विस रस्ते अनेक ठिकाणी खराब झालेले आहे अशा रस्त्याचे काम पण वेळोवेळी करत नाहीत .

अनेक सर्विस रस्त्यावर पडलेले खड्डे लवकर बुजवत नाहीत. अनेक ग्रामीण भागात सर्विस रस्त्यावर नाल्यातील पाणी तळ्यासारखे साचून राहते त्यामुळे तेथील रहिवाशांना

नाहक त्रास सहन करावा लागतो तर या पाण्यातून रस्ता काढावा लागतो त्यामुळे सर्वीस रस्त्यावर अपघाताचे प्रमाण खूप वाढले आहे असाच एक अपघात दिनांक २२ रोजी तुळजापूर हुन येणारी मालवाहतूक ट्रक घाटाच्या पायथ्याशी सर्विस रोडच्या नालीचे काम अपूर्ण राहिल्यामुळे ट्रकचालकास समोरील खड्डा न दिसल्याने आणि त्या खड्ड्यात पाणी साचल्याने तो ट्रक पलटी झाला. सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. असंच राहिले तर भविष्यात मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.अनेक ि

ठकाणी दिशादर्शक बोर्ड नाहीत नॅशनल हवे सोबत सर्विस रस्त्याकडे पण आयआरबी कंपनीने लक्ष देण्याची मागणी प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात आहे.नाल्याचे अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण करण्याची मागणी स्थानिक रहिवाशी करत आहेत.

## राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धत उमरगाची व्हनमाने प्रिती प्रथम तर मुरुमची शिंदे पोर्णिमा द्वितीय क्रमांक पटकाविला



**मुरुम,प्रतिनिधी**: कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर कोरोनाशी संबंधित विविध विषयांवरती ही स्पर्धा ऑनलाइनद्वारे घेण्यात आली होती. श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धा २०२० चा निकाल जाहीर करून स्पर्धकांना बक्षीस देवून त्यांचा यथोचित सत्कार शुक्रवारी महाविद्यालयात करण्यात आला. या स्पर्धत गुणानुक्रमे आलेल्या स्पर्धाकांचा प्राचार्य डॉ.अशोक सपाटे यांच्या हस्ते वैचारिक ग्रंथ, प्रशस्तीपत्र व पुष्पहार घालून स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सायबण्णा घोडके, डॉ.अरविंद बिराजदार, डॉ.संध्या डांगे, डॉ.भिलसिंग जाधव, प्रा.अशोक बावगे, राजू ढगे, एम.सी.पाटील, पालक लिंबाण्णा व्हनमाने, लखन शिंदे, विक्रम गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धत प्रथम क्रमांक कुमारी व्हनमाने प्रिती, श्रमजीवी अध्यापक विद्यालय, उमरगा (डी.एड. प्रथम वर्ष), द्वितीय क्रमांक शिंदे पोर्णिमा, श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम (बी.कॉम.तृतीय वर्ष), तृतीय क्रमांक गायकवाड अदिराज, श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी (बी.एस्सी.प्रथम वर्ष), तर उत्तेजनार्थ राठोड बेलेश्वर, श्रमजीवी अध्यापक विद्यालय, उमरगा (बी.एड. प्रथम वर्ष) यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देवून सत्कार करण्यात आला. सदर ऑनलाईन स्पर्धत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील १८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धचे समन्वयक प्रा.डॉ.महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा.डॉ.सुभाष हुलपल्ले यांनी मानले.

## रेशन किट व मास्कचे वाटप

**नळदुर्ग,(प्रतिनिधी)**:



देशात कोरोनाचा वाढता प्रसार जानेवारी महीन्यापासूनच सुरु झाला आहे, त्यामुळे अशा धोकादायक परिस्थीतीत सामाजिक बांधीलकी म्हणून सिमेंन्स गमेसा व सेवा वर्धीनी पुणे या दोन संस्थांच्या वतीने तुळजापूर व लोहारा तालुक्यातील प्रत्येक पंधरा गावामध्ये पंधरा रेशन किट व १०० मास्क देण्यात आले आहेत.

सिमेंन्स गमेसा व सेवार्धीनी पुणे या दोन संस्थांच्या वतीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाउन चालू झाल्यापासून गोर गरीब व गरजू कुटूंबाची मोठा प्रमाणात हाल होत आहेत, अशा परिस्थीतीत त्यांच्या पाठीशी कोणी तरी उभे रहावे या हेतुने या दोन संसथांच्या वतीने तुळजापूर व लोहारा तालुक्यातील प्रत्येकी पंधरा गावात पंधरा रेशनचे किट व शंभर मास्कचे वाटप करण्यात आले आहे. यावेळी सॅनिटायझर व हॅंडग्लोज ही वाटप करण्यात आले. सर्व शासनाचे सर्व नियमांचे पालन करुन हे साहीत्य वाटप करण्यात आले आहेत. साहीत्य वाटप करण्यासाठी सिमेंन्स गमेंसा चे साईट इनचार्ज व सेवावर्धीनीचे मारुती पांचाळ, राष्ट्रीय युवा स्वंयसेवक पुरुषोत्तम बेले, हिप्परगा ग्रामपंचायत सदस्य धर्मवीर जाधव, किरण चिंचोले, संतोष गायकवाड, विकास लांडगे, आण्णासाहेब तरंगे, जयश्री बिराजदार, किशोर होणाजे आदीजण उपस्थीत होते.

## सय्यद आवेज जहागीरदार यांचे एलएलबी परिक्षेत घवघवीत यश

**नळदुर्ग,(प्रतिनिधी)**:नळदुर्ग येथील सय्यद आवेज अखलाक जहागीरदार यांनी विधीज्ञ ( एल एल बी) परिक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. या यशाबददल त्यांचे नळदुर्ग व परिसरात कौतुक होत आहे, या प्रसंगी त्याचे कुटूंब व मित्र परिवारा तर्फे सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी एस के जहागीरदार, अखलाक जहागीरदार, इरफान जहागीरदार, कैसर जहागीरदार यांच्यासह मित्र परिवार व कुटूंबातील व्यक्ती उपस्थीत होते.

## राम मंदिर भूमीपूजनाला विरोध, अलाहाबाद हायकोर्टात याचिका दाखल

**प्रयागराज**:अयोध्येतील राम मंदिर निर्मितीचं भूमीपूजन ५ ऑगस्ट रोजी होणार आहे. मात्र या प्रस्तावित भूमीपूजनाला विरोध करण्याची मागणी करत एक याचिका अलाहाबाद हायकोर्टात दाखल केली आहे. हायकोर्टात एका पत्रकाराने ही याचिका दाखल केली आहे. यात राममंदिराचं भूमीपूजन म्हणजे अनलॉक २ च्या गाईडलाईन्सचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे.दिल्लीचे पत्रकार साकेत गोखले यांनी हायकोर्टात चीफ जस्टिस यांना लेटर पीआयएलच्या माध्यमातून ही याचिका केली आहे. गोखले यांनी दाखल केलेल्या याचिकेत त्यांनी म्हटलं आहे की, भूमीपूजन कोविड-१९ च्या अनलॉक-२ गाईडलाईन्सचं उल्लंघन आहे.याचिकेत म्हटलं आहे की, अयोध्येमध्ये भूमीपूजनाच्या कार्यक्रमासाठी ३०० लोकं एकत्रित होतील, जे कोविड १९ च्या नियमांच्या विरोधी आहे. यात असं देखील म्हटलं आहे की, या कार्यक्रमामुळं कोरोनाचं संक्रमण वाढण्याची शक्यता आहे. केंद्राच्या गाईडलाईन्समधून यूपी सरकारला सूट मिळू शकत नाही.

# कोरोनाला हद्दपार करण्यासाठी एकजूट व्हावे: बसवराज पाटील



**जळकोट,(प्रतिनिधी)**:गेल्या तीन महिन्या पासून कोरोना या संसर्ग आजाराने कहर केला आहे.कोरोना या संसर्गजन्य आजाराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढू लागली आहे. अशा या महामारीच्या संकटात एकमेकांना माणुसकीच्या भावनेने आधार देण्याची गरज निर्माण झाली आहे . कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावा मुळे जनजीवन भयभीत झाले आहे. उमरगा शहरात कोरोनाचा संसर्ग वाढत आहे. संसर्ग रोखण्या करीता नगर परिषदेच्या नगरसेवकांनी आपआपल्या वार्डाची जबाबदारी घेऊन जनतेला धीर देण्याची गरज असल्याचे माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यानी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांना आयोजित बैठकीत आदेशीत केले आहे.

आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात सामाजिक अंतराच्या नियमांचे पालन करून उमरगा नगर परिषदेतील काँग्रेस नगरसेवकांच्या बैठकीचे आयोजन केले.या वेळी पाटील यांनी नगरसेकांना उमरगा शहरात वाढत चाललेल्या कोरोना संसर्गाच्या उपाययोजनांची माहीती दिली.कोरोना या महामारीच्या संकटात काँग्रेस पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांसह नगरसेवकांनी माणुसकीचे दर्शन घडविण्याची गरज निर्माण झाली आहे.कोरोना या संसर्ग आजारा बाबत नगरसेवकांनी जनजागृती हाती घ्यावी व त्याची काटेकोर पणे अंमलबजावणी करावी .

ऑक्सीमीटर, थर्मलस्कॅनर , घरोघरी जाऊन करावे . प्रत्येक वार्डावार्डात १० स्वयंसेवकांच्या नेमणुका कराव्यात. शहरा मध्ये सोडियम हायफोक्लोराईडची फवारणी तात्काळ करण्यात यावी. बाहेरुन शहरात येणाऱ्यां रॅपीड, ( अँन्टीजन ) टेस्ट करणे सक्तीचे करावे . मास्क , सॅनेटायझरचा वापर बंधनकारक करावा. आयुष काढा , गरम पाणी , वाफ , व्यायाम , प्रतिकार शक्ती वाढविणारा आहार या बाबत नागरीकांचे प्रबोधन करावे.

शनिवार पासून उमरगा शहरात संचारबंदी लागू करण्यात येत आहे . संचारबंदीच्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. शहरातील होणाऱ्या लग्न समारंभ , एंगेजमेंट सारख्या सार्वजनिक कार्यक्रमावर निर्बंध घालावेत. भाजीपाला , फळे ,किराणा व इतर सर्व व्यवहार संचारबंदीच्या काळात बंद ठेवावेत. कोरोनाचे रुग्ण आढळून आलेल्या वार्डातील संचारबंदीची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. अशा सुचना या वेळी त्यांनी उपस्थित नगरसेवकांना व कार्य कर्त्याना दिल्या.या आजाराने भयभीत झालेल्या सर्व सामान्य माणसांची सेवा करण्याची हिच खरी वेळ आहे. माणुसकीचे खरे दर्शन दाखवून जनतेला धीर द्या . असेही पाटील यांनी या वेळी स्पष्ट केले. या बैठकीसाठी प्रकाश आष्टे ,सुभाष राजोळे,दिलीप भालेराव,प्राचार्य डॉ. दिलीप गरूड नगराध्यक्षा प्रेमलता टोपगे सह काँग्रेस पक्षाचे नगरसेवक .विजय वाघमारे,नगरसेवक अतिक मुन्सी,विक्रम मस्के,वसिम शेख उपस्थित होते.